**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स पराग एग्रो फुडस् एण्ड अलाईड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड, (पीएएफएपीपीएल),रावडेवाडी, तालुका- शिरुर, जिल्हा - पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प ४,५००.० टन प्रतीदिन ते ७,५०० टन प्रतीदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.० मेगावॅट ते ३२.० मेगावॅट आणि प्रस्तावित आसवणी प्रकल्प ४५.० किलोलिटर प्रतीदिन ते १००.० किलोलिटर प्रतिदिन प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स पराग एग्रो फुडस् एण्ड अलाईड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड, (पीएएफएपीपीएल),रावडेवाडी, तालुका- शिरुर, जिल्हा § पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प ४,५००.० टन प्रतीदिन ते ७,५०० टन प्रतीदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.० मेगावॅट ते ३२.० मेगावॅट आणि प्रस्तावित आसवणी प्रकल्प ४५.० किलोलिटर प्रतीदिन ते १००.० किलोलिटर प्रतिदिन प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक, २९ सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक

०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-८४ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२१०९१६-एफटीएस-००९५ दिनांक १६ सप्टेंबर, २०21 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, पुणे<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे. | - | **आयोजक** |

सुरुवातीला श्री प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, म.प्र.नि. मंडळ, पुणे सदस्य आणि आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री हिम्मत खराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सदरची सुनावणी भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४-०९-२०२० च्या Office Memorandum नुसार बैठकीच्या स्थानी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. सदस्य, आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

सदस्य, आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री प्रताप जगताप यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स पराग एग्रो फुडस् एण्ड अलाईड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड, (पीएएफएपीपीएल), रावडेवाडी, तालुका- शिरुर, जिल्हा - पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प ४,५००.० टन प्रतीदिन ते ७,५०० टन प्रतीदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प १४.० मेगावॅट ते ३२.० मेगावॅट आणि आसवणी प्रकल्प ४५.० किलोलिटर प्रतीदिन ते १००.० किलोलिटर प्रतिदिन प्रकल्पाबाबतची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग १ (ड), ५ (जी) आणि ५ (जे) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील

सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील राज्य पर्यावरण तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०१-०४-२०२१ रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, म.प्र.नि. मंडळ, पुणे यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला,

ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-पुणे, मा. अप्पर जिल्हादंडाधिकारी कार्यालय§पुणे, मुख्य कार्यकारी अधिकारी- जिल्हा परिषद- पुणे, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र- पुणे, तहसीलदार, तहसील कार्यालय-शिरुर, जिल्हा§पुणे, ग्रामपंचायत कार्यालय- रावडेवाडी, तालुका § शिरुर, जिल्हा § पुणे, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

सदस्य, आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संध◌ी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

श्री जगताप, सदस्य, आयोजक यांनी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण

व्यवस्थापनासाठी एकूण खर्च रुपये १,०८५.० लाख आहे. तर कारखान्यासाठी आवर्ती खर्च रुपये ७४.२५ लाख एवढा प्रती वर्षी आहे. सदरहू प्रस्तावित आसवानी प्रकल्प हा शून्य द्रव नि:सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असून प्रकल्प सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री प्रविण आनंदा पवार, राहणार-आमदाबाद,तालुका-शिरुर, जिल्हा-पुणेः-**

मी या परिसरात शेतीचे काम करतो व माझा ऊसही या प्रकल्पात येतो. प्रस्तावित आसवणी प्रकल्प विस्तारिकरणामुळे होणा-या प्रदूषणाची तीव्रता कमी करावी एवढीच मी मागणी करतो. ते जल वा हवा प्रदूषण असेल, त्यासाठी प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने कार्यान्वित करण्यात यावी. माझे प्रकल्पास समर्थन आहे. माझे गाव प्रकल्पापासून ८.० कि.मी. लांब आहे.

२) **श्री पोपट बबन रोहिले, राहणार- मुक्काम रोहिलेवाडी, पोस्ट § कवठे यमाई, तालुका-शिरुर, जिल्हा-पुणेः-**

सदरहू प्रकल्प कार्यान्वित कधी होणार?

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की आसवणी प्रकल्पातील काही भाग या वर्षी व प्रस्तावित

विस्तारिकरणाचा काही भाग हा पुढच्या वर्षी कार्यान्वित करणार आहोत. १-२ वर्षात प्रकल्प संपूर्ण कार्यान्वित होईल.

३) <u>**श्री योगेश मोहनराव थोरात, राहणार-मुक्काम पोस्ट-आमदाबाद, तालुका-शिरूर, जिल्हा-पुणेः-**</u>

माझे गाव प्रकल्पापासून ८.० कि.मी. अंतरावर आहे. सदरहू विस्तारिकरण प्रकल्पाचा स्थानिक शेतक-यांना काय फायदा होणार आहे काय? शेतक-यांचा आर्थिक स्थर उंचावणार का?

प्रकल्प कार्यकारी संचालक यांनी सांगितले की आसवणी प्रकल्प असो वा को-जन/सहवीज निर्मिती प्रकल्प असो, त्यामुळे कारखान्याची आर्थिक स्थिती सुधारेल व स्थानिक शेतक-यांच्या ऊसाला जादा भाव देता येऊ शकेल. परिसरात सीएसआर उपक्रमात विविध योजनांसाठी खर्च करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे विविध योजना राबविता येतील.

४) <u>**श्री संतोष म्हतारबा गायकवाड, राहणार-पिंपरखेड, तालुका-शिरुर, जिल्हा-पुणेः-**</u>

प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्पातून जे औद्योगिक सांडपाण्याची निर्माण होऊन प्रदूषण होईल. तर प्रदूषणाबाबत काय उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणामुळे प्रकल्पात जे सांडपाणी तयार होईल, त्यावर प्रक्रिया करुन ते प्रकल्पातील हरितपट्टा विकासासाठी वापरणार आहोत. तर आसवणी प्रकल्प हा पूर्णपणे झिरो लिक्विड

डिस्चार्ज/शून्य द्रव निःसारण प्रकल्प असेल. आसवणी प्रकल्पातून एकही थेंब पाणी बाहेर पडणार नाही. आसवणी प्रकल्पात जे स्पेंट वॉश तयार होते, त्यावर एमईई (Multi Effective Evaporator) मध्ये प्रक्रिया करुन त्याची वाफ करण्यात येईल. त्या पाण्यास कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिटमध्ये प्रक्रिया करण्यात येऊन त्या पाण्याचा आसवणी प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. (उरलेला लगदा आपण बॉयलरमध्ये जाळण्यात येणार आहे).

५) **<u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, अध्यक्ष, पर्यावरण परिरक्षणा संस्था, शिवाजीनगर, नालगोंडा जिल्हा, तेलंगण राज्यः-</u>**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्प प्रवर्तकांचे विस्तारीकरण हाती घेतल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की ते भारतातील पहिले पर्यावरणवादी आहेत की जे प्रकल्पास पाठिंबा देतात. भारतातील बरेच पर्यावरणवादी प्रकल्पांना विरोध करतात, मात्र मी प्रकल्पास पाठिंबा देतो. माझ्या मते बेकारी हे सर्वात जास्त प्रदूषण आहे. भारतात १८ ते ३५ वयोगटातील सुमारे ४० कोटी बेकार असताना त्यांना नोकरीची संधि मिळणे गरजेचे आहे. शासकीय नोक-या सर्वांनाच मिळत नाहित. बरेच पर्यावरणवादी आरोग्याच्या प्रश्नांना प्रकल्पांना जबाबदार धरतात. मात्र भारतातील ८५% लोक प्रकल्पांजवळ राहत नाही.

प्रकल्पास पाठिंबा दर्शवत त्यांनी पुढील सुचना केल्या -

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरणाचे योग्य प्रकारे सर्वेषण केले, त्याबद्दल त्यांनी पर्यावरण सल्लागार यांचे

अभिनंदन केले. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि. मी. परिघातील माझी सूचना आहे की परिसरातील आरोग्य व शैक्षणिक सर्वेषण करण्यात यावे,

प्रकल्प प्रवर्तकांनी १० कि.मी. परिघातील भूगर्भातील पाण्याचे सर्वेषण करावे. पावसाचे पाणी वाचविण्यासाठी मोठी साठवण टाकी बांधण्याची सूचना केली. त्या टाकीतील पाणी प्रक्रियेसाठी वापरण्यात यावे. परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरित पट्टा, झाडे विकसित करण्यात यावीत. त्यामुळे धुळीच्या प्रदूषणापासून संरक्षण मिळेल. श्री रेड्डी यांनी सूचना केली की प्रकल्प परिसरातील गावांमध्ये हरित पट्टा विकसित करताना फळझाडे आणि औषधी वनस्पती अधिक प्रमाणात लावण्यात यावीत. स्थानिक युवक व युवतींना कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेऊन रोजगार मिळण्यासाठी सक्षम करावे. त्यामुळे स्थानिकांना आपल्या प्रकल्पात किंवा इतर ठिकाणी रोजगाराची संधी मिळेल.

श्री रेड्डी यांनी सूचना केली सीएसआर योजना राबविण्यासाठी समन्वय समितीची स्थापना करण्यात यावी त्यात कंपनीचे अधिकारी, प्रशासनातील अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा समावेश करण्यात यावा.

त्यांनी सूचना केली की विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे, त्याचप्रमाणे Immunity Safety साठी कार्यक्रम राबविण्यात यावा.

श्री रेड्डी यांनी पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस प्रकल्पास विना हरकत त्वरित मान्यता देण्याची सूचना महाराष्ट्र शासनास केली. त्यांनी त्यांचे इंग्रजीतील निवेदन समितीस सादर केले.

६) **<u>श्री ए. वेंकटेश रेड्डी, एनजीओः-</u>**

त्यांनी सांगितले प्रकल्प हे देशाच्या विकासाचा कणा आहेत. विविध प्रकल्पामुळे शासनास महसूल प्राप्त होत असतो. प्रदूषणासाठी फक्त विविध प्रकल्पच जबाबदार नाहित, तर इतरही घटक जबाबदार आहेत. त्यांनी प्रदूषण नियंत्रणासाठी काही सूचना केल्याः-

प्रकल्प हा नीटनेटका ठेवण्यात यावा, प्रकल्पात अत्यंत आधुनिक अशी यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी, स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात यावी अशी त्यांनी सूचना केली. सदरहू प्रकल्पास त्वरित विना हरकत मान्यता देण्याची सूचना केली.

७) **<u>श्री सुदर्शन, एनजीओः-</u>**

त्यांनी प्रकल्प विस्तारिकरणास पाठींबा देताना सांगितले की प्रकल्पात बालकामगारांना नोकरी देऊ नका. स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात यावी. सीएसआर निधी मूलभूत शिक्षणासाठी खर्च करण्यात यावा. कंपनीत सुरक्षा व्यवस्था योग्य प्रकारे ठेवण्यात यावी. मी कंपनी विस्तारिकरणास समर्थन देत आहे.

८) **श्री. एच. मधुबाबू, सामाजीक पर्यावरण कार्यकर्ता, रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबादः-**

त्यांनी सांगितले की कारखाना विस्तारिकरणास पाठींबा देत असून लेखी सूचना देत आहे. लेखी सूचनांचा विचार व्हावा. त्यांनी लेखी निवेदन पर्यावरण समितीस दिले.

यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताही प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की, मे. पराग एग्रो प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जनसुनावणीस १० कि.मी. परिघातील जनता उपस्थित असून त्यांनी बैठकीत सूचना, आक्षेप नोंदविलेले असून बैठकीत एकंदरीत १३ लेखी सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सदरहू लेखी सूचना बैठकीच्या इतिवृतासोबत शासनास पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील. त्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्यावतीने पर्यावरणविषयक बैठक संपन्न् झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

सोबत बैठकीत प्राप्त झालेली १४ लेखी निवेदने जोडलेली आहेत.

**(प्रताप जगताप),**
सदस्य, आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
पुणे-१,
म.प्र.नि. मंडळ, पुणे

**(हिंम्मत खराडे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,पुणे
जिल्हा-पुणे